Estd 1962

Naac ‘A+++’ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दि.४/२/२०२२

## दि.७ व ८ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित मॉक टेस्टबाबत

विद्यापीठाकडील आयोजित सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२१ (हिवाळी सत्राच्या) परीक्षा दि. १४ फेब्रुवारी २०२२ पासून सुरु होणार आहेत. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणकप्रणालीचा डेमो व्हिडीओ ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी तो पहावा. ऑनलाईन परीक्षेपूर्वी दि. ७ व ८ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी १२.३० ते २.३० या कालावधीत मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले असून यासाठीचा युजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएस द्वारे पाठविण्यात आला आहे. ज्या विद्यार्थ्यांना युजर आयडी व पासवर्ड प्राप्त झालेला नाही अशा विद्यार्थ्यांनी सदर लिंकवर जावून **“Get Your Password”** हा पर्याय निवडून आपल्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर पासवर्ड मिळवावा. तसेच तांत्रिक अडचणीसाठी विद्यापीठाच्या कॉल सेंटर/हेल्प लाईन क्रमांक ८९८०००१२४९ यावर संपर्क साधावा. तरी मुख्य परीक्षेमध्ये कोणतीही तांत्रिक अडचण होवू नये यासाठी विद्यापीठाकडील परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी सदरची मॉकटेस्ट देणे बंधनकारक आहे, याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. परीक्षेचे वेळापत्रक व अन्य माहिती/सूचनासाठी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी केले आहे.